जिल्हा परिषद अमरावती
मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय
दूरध्वनी क्रमांक ०७२१ २६६२९२६
ई-मेल – ceozp.amravati@maharashtra.gov.in

जा.क्र – जिप/मुकाअ/स्वी.स./ १४९० दिनांक- १८ एप्रिल २०२६

विकसित महाराष्ट्र २०४७ व्हिजन डॉक्युमेंटमधील मार्गदर्शक तत्वानुसार अमरावती जिल्हा परिषदेचा रोडमॅप तयार करुन गावस्तरावर अंमलबजावणी करणेबाबत...

**आदेश**

विकसित महाराष्ट्र २०४७ व्हिजन डॉक्युमेंटमधील मार्गदर्शक तत्वानुसार अंमलबजावणीच्या प्रगतीचा तसेच सन २०२९ पर्यतच्या कृती योजनांवर भर देवून अमरावती जिल्हा परिषदेचा रोडमॅप तयार करणे आणि त्यानुसार गावस्तरावर अंमलबजावणी करणेसाठी जि.प. मुख्यालय स्तरावर "समन्वय व सनियंत्रण कक्ष" स्थापन करण्यात येत असून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना **सह नोडल अधिकारी** म्हणून जबाबदारी सोपविण्यात येत आहे.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सह नोडल अधिकारी विकसित महाराष्ट्र २०४७-(अमरावती जि.प. व्हिजन डॉक्युमेंट) करीता जिल्हयाचा रोडमॅप तयार करण्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१. विकसित महाराष्ट्र २०४७ च्या अंमलबजावणीसाठी ग्रामविकास विभागाने तयार केलेल्या आराखडा नुसार सबंधित सर्व विभागांचे इंडिकेटर/मॅट्रीक्स प्रमाणे अमरावती जि.प.चा कृती आराखडा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांच्या मदतीने तयार करावा.
२. ग्रामविकास विभागाकडून वेळोवेळी प्राप्त मार्गदर्शक सूचनांप्रमाणे गावपातळीवर अंमलबजावणी होत आहे याची खात्री करणे.
३. राज्य आणि जिल्हास्तरावर व्हिजन डॉक्युमेंटचे सादरीकरण करणेसाठी (PPT Presentation) आवश्यकतेनुसार तांत्रिक मनुष्यबळ (Soft. Developer/AI expert) सामान्य प्रशासन विभाग/माहिती तंत्रज्ञान विभागकडून उपलब्ध करुन घेणे.
४. राज्य आणि विभागस्तरावरील आयोजित बैठकांसाठी गरजेनुसार हजर राहून अनुपालन सादर करणे इत्यादी.

(सत्यम गांधी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अमरावती

प्रति,

श्री. विनय ठमके, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अमरावती.

प्रतिलिपी,

१. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत,जि.प. अमरावती यांना आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित. विकसित महाराष्ट्र २०४७ व्हिजन डॉक्युमेंटमधील मार्गदर्शक तत्वानुसार अमरावती जिल्हा परिषदेचा रोडमॅपतयार करणेसाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सल्लानुसार आवश्यक कार्यवाही करावी.
२. सर्व विभाग प्रमुख, जि.प. अमरावती.
३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती.....सर्व,